RNI No. MAHBIL/2009/31748


# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ५, अंक १६] मंगळवार, मार्च ५, २०१९/फाल्गुन १४, शके १९४० [ पृष्ठे १३, किंमत : रुपये २६.००


**असाधारण क्रमांक २७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### नगरविकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २ मार्च २०१९.

### अधिसूचना

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमयूएन-२०१८/प्र.क्र. १२/नवि-१८.—ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ३४१क चे पोट-कलम (१), (१ख), (२) आणि कलम ३ चे पोट-कलम (३) यांच्या तरतुदीनुसार, शासन उद्घोषणा, नगरविकास विभाग, क्र. एमयूएन-२०१८/प्र.क्र. १२/नवि-१८, दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ याद्वारे **महाराष्ट्र शासन राजपत्र** दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ यामध्ये उद्घोषणा प्रसिद्ध केली असून, महाराष्ट्र शासनाने यवतमाळ जिल्ह्यातील ढाणकी या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमित होणारे क्षेत्र हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यासाठी व उक्त संक्रमणात्मक क्षेत्रासाठी "ढाणकी नगरपंचायत" या नावाने नगरपंचायत घटीत करण्यासाठी, उक्त अधिनियमाचे कलम ३४१क चे पोट-कलम (१), (१ख), (२) आणि कलम ३ चे पोट-कलम (३) या अन्वये अधिसूचना काढण्याच्या आपल्या प्रस्तावावर आक्षेप मागविले होते ;

आणि ज्याअर्थी, अधिसूचनेत नमूद कालावधीत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे एकही आक्षेप/हरकत प्राप्त झालेली नाही ;

आणि ज्याअर्थी, भारताचे संविधानाच्या अनुछेद २४३-थ च्या खंड (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाला, यासोबत जोडलेल्या अनुसूची "अ" मध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले उक्त स्थानिक क्षेत्र हे, संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करणे इष्ट वाटते.

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाचे कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१ख) आणि (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याबाबतीत समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त स्थानिक क्षेत्र हे, संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करीत असून, त्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ क चे पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, "ढाणकी नगरपंचायत" या नावाने एक नगरपंचायत घटीत करण्यात येत आहे. उक्त संक्रमणात्मक क्षेत्राच्या हद्दी यासोबत जोडलेल्या अनुसूची "ब" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

**अनुसूची "अ"**

**संक्रमणात्मक क्षेत्राच्या अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेले स्थानिक क्षेत्र**

ढाणकी ग्रामपंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र.

**अनुसूची "ब"**

**संक्रमणात्मक क्षेत्रातील स्थानिक क्षेत्राच्या हद्दीचा तपशील.**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन १९५९ चा क्र.तीन) अन्वये स्थापन केलेल्या ढाणकी या ग्रामपंचायतीच्या क्षेत्राची हद्द.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश मोघे,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated 2nd March 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUN-2018/C.R.12/UD-18.—Whereas, by the Government Proclamation, Urban Development Department, No. MUN-2018/C.R.12/UD-18, dated the 31st August 2018 published in the *Maharashtra Government Gazette*, dated the 31 August, 2018, issued in pursuance of the provisions of sub-section (*1*), (*1B*) (*2*) of section 341-A read with sub-section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) (hereinafter referred to as "the said act"), the Government of Maharashtra had invited objections in the *Maharashtra Government Gazette*, to its proposal to issue a notification under sub-sections (*1*), (*1B*) (*2*) of section 341-A read with sub-section (*3*) of section 3 of the said Act, to specify the local area of the Village Panchayat of Dhanki in Yavatmal District, being an area in transition from a rural to an urban area and to constitute a Nagar Panchayat by the name of the Dhanki Nagar Panchayat for the said transitional area;

And whereas, not any single objections and suggestion has received from Collector, Yavatmal pursuant to the said Proclamation within the period of 30 days specified therein;

And whereas, having regard to the factors mentioned in clause (2) of article 243-Q of the Constitution of India, the Government of Maharashtra considers it expedient to specify the said local area, more particularly described in Schedule "A" appended hereto, to be a transitional area;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*), (*1B*) and (*2*) of section 341A of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby specifies the said local area to be a transitional area, for which there shall be constituted a Nagar Panchayat, as provided in sub-sections (*2*) of said section 341A of the said Act, by the name Dhanki Nagar Panchayat.

The boundaries of the said transitional area shall be such as are specified in Schedule "B" appended hereto.

*Schedule "A"*

*Description of the local area to be specified as a transitional area*

The whole area of the Village Panchayat of Dhanki

*Schedule "B"*

*Boundaries of the local area to be specified as a transitional area*

Boundaries of the area of the Village Panchayat of Dhanki constituted under the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH MOGHE,
Deputy Secretary to Government.

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २ मार्च २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी-२०१८/ प्र.क्र. ६७/(१)/पं.रां. ५.—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम पाच) याचे कलम ४ चे पोट-कलम (१) यासह २५४ चे पोट-कलम (१) चा खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेल्या भूमापन क्रमांक समाविष्ट असलेली स्थानिक क्षेत्रे स्तंभ (६) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून यवतमाळ जिल्ह्यातून वगळीत आहे :—

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | जिल्हा (२) | गट (३) | निवडणुक विभाग (४) | स्थानिक क्षेत्र (५) | वगळण्याचा दिनांक (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | यवतमाळ | उमरखेड | ढाणकी | मौ. ढाणकी ग्राम पंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र. | २ मार्च २०१९ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय बनकर,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,

Fort, Mumbai 400 001, dated the 2nd March 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB-2018/CR-67/(1)PR 5.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of sub-section (*1*) of section 254 read with sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby excludes from the Yavatmal District, the local areas specified in column (5) of the Schedule appended hereto, with effect from the date mentioned in column (6) thereof :—

*Schedule*

| Sr. No. (1) | District (2) | Block (3) | Electoral Division (4) | Local areas (5) | Date of exclusion (6) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Yavatmal | Umarkhed | Dhanki | The whole area of the *Village Panchayat* of Dhanki. | 2nd March 2019 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANKAR,

Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २ मार्च २०१९

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी-२०१८/प्र.क्र. ६७/(२)/पं.रां. ५.—महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा. अधिनियम-पांच) यांचे कलम ५ यासह २५६ चे पोट-कलम (१) चा खंड (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेल्या भूमापन क्रमांकाचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्रे स्तंभ क्रमांक (६) मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक २ मार्च २०१९ पासून यवतमाळ जिल्ह्याच्या उमरखेड गटातून वगळीत आहे आणि त्या प्रयोजनार्थ शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पीएसई-१०९६/प्र.क्र. ११४/०५, दिनांक १९ सप्टेंबर १९९६ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये, यवतमाळ जिल्ह्याशी संबंधित नोंद २४ मध्ये उमरखेड तालुक्याशी संबंधित स्तंभ (३) मधील नोंदी समोर स्तंभ (४) मध्ये "उमरखेड गट" या शब्दाऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"उमरखेड गट खालील स्थानिक क्षेत्र वगळून

मौ. ढाणकी ग्राम पंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र".

### अनुसूची

| अ.क्र. (१) | जिल्हा (२) | गट (३) | निर्वाचक गण (४) | स्थानिक क्षेत्र/तालुका (५) | वगळण्याचा दिनांक (६) |
|---|---|---|---|---|---|
| १. | यवतमाळ | उमरखेड | ढाणकी | मौ. ढाणकी ग्राम पंचायतीत असलेले संपूर्ण क्षेत्र. | २ मार्च २०१९ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय बनकर,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,
Fort, Mumbai 400 001, dated the 2nd March 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. ZPB-2018/CR-67/(2)PR 5.—In exercise of the powers conferred by clause (b) of sub-section (*1*) of section 256 read with section 5 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby excludes from the Umarkhed Block of Yavatmal District, the local areas specified in column (5) of the Schedule appended hereto, with effect from the 2nd day of March 2019 ; and for that purpose amends the Government Notification, Rural Development and Water Conservation Department, No.PSE-1096/CR-114/05, dated the 19th September, 1996 as follows, namely :—

In the Schedule appended to the said notification, in entry 24 relating to Yavatmal District, against entry in column (3) relating to Umarkhed Taluka, in column (4), for the words " Umarkhed Block" the following shall be substituted, namely :—

" Umarkhed Block excluding the following local areas—

The whole area of the Village Panchayat of Dhanki".

*Schedule*

| Sr. No. (1) | District (2) | Block (3) | Electoral College (4) | Local areas (5) | Date of exclusion (6) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Yavatmal | Umarkhed | Dhanki | The whole area of the Village Panchayat of Dhanki. | 2nd March 2019 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANKAR,
Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २ मार्च २०१९.

### अधिसूचना

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी. २०१५/प्र.क्र. ९ (भाग १)/(३)/पं.रां. ५.—महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (सन १९५९ चा महा. अधिनियम-तीन) यांचे कलम ४ चे पोट-कलम (२) चा खंड (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ चा खंड (ग) व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांनुसार व संविधानाच्या भाग-IX च्या उद्देशार्थ आणि स्थायी समिती जिल्हा परिषद, यवतमाळ, आणि ग्राम सभा व मसिक सभा, ढाणकी यांच्याशी विचार विनिमय करून महाराष्ट्र शासन याद्वारे, सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले स्थानिक क्षेत्र त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून गावाचा भाग म्हणून राहणार नाही असे जाहीर करीत आहे.

### अनुसूची

| अ.क्र. (१) | गावे (२) | स्थानिक क्षेत्रे (३) | गाव म्हणून संपुष्टात आल्याचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| १. | ढाणकी | मौ. ढाणकी ग्राम पंचायतीत असलेले संपुर्ण क्षेत्र. | २ मार्च २०१९ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय बनकर,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,
Fort, Mumbai 400 001, Dated the 2nd March 2019.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT, 1961.

No. ZPB-2018/CR-67/(3)/PR 5.—In exercise of the powers conferred by clause (b) of sub-section (*2*) of section 4 of the Maharashtra Village Panchayats Act (III of 1959), read with clause (g) of article 243 of the Constitution of India, and of all other powers enabling it in that behalf, and in partial modification of all earlier notifications issued in this behalf, and after consultation with the Standing Committee of the Yavatmal *Zilla Parishad*, and *Gram Sabha and Village Panchayat* of Dhanki in Yavatmal District, the Government of Maharashtra, hereby declares that the local areas specified in column (3) of the Schedule appended hereto, comprising the revenue village Dhanki as specified in column (2) thereof, shall cease to be the village, for the purpose of Part IX of the Constitution, with effect from the date shown in column (4) thereof.

*Schedule*

| Sr. No. (1) | Revenue Village (2) | Local areas (3) | Date of cessation (4) |
|---|---|---|---|
| 1. | Dhanki. | The whole area of the *Village Panchayat* of Dhanki. | 2nd March 2019 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANKAR,
Deputy Secretary to Government.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक २ मार्च २०१९.

**आदेश**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक झेडपीबी-२०१८/प्र.क्र. ६७/(४)/पं.रां. ५.—ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०), याच्या कलम ३४१अ चा पोट-कलम (१) व (१अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना नगरविकास विभाग क्र. एमयूएन-२०१८/प्र.क्र. १२/नवि-१८, दिनांक २ मार्च २०१९ (यात यापुढे जिचा "उक्त अधिसूचना" असा निर्देश करण्यात आला आहे.), अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३४१अ चा पोट-कलम (१), (१क) आणि (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने यवतमाळ जिल्ह्यातील ढाणकी महसुली गावाचे स्थानिक क्षेत्र हे लहान नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केले आहे आणि त्या करीता उक्त अधिनियमाच्या कलम ३४१ क चे चा पोट-कलम (१), (१ब) आणि (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे **ढाणकी नगरपंचायत** या नावाने नगरपंचायत गठित करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेस अनुसरून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा पाच), याच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा खंड (सहा) अन्वये विद्यमान स्थानिक प्राधिकरणाची मत्ता, हक्क आणि दायित्वे (त्याने केलेला कोणताही करार किंवा संविदा या खालील हक्क व दायित्वे धरून ) उत्तराधिकारी स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचा आदेश देणे इष्ट आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम २५५ च्या पोट-कलम (२) चा खंड (सहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, असा निदेश देते की, यवतमाळ जिल्ह्यातील ढाणकी महसुली गावासंबंधात यवतमाळ जिल्हा परिषदेच्या सर्व मत्ता, हक्क आणि दायित्वे (तिने केलेला कोणताही करार किंवा संविदा या खालील हक्क व दायित्वे धरून) ही, शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक एमपीएच-१९९७ /सीआर-६४५/५६(४७), दिनांक २० जुलै १९९९ यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीवर ढाणकी नगर पंचायतीकडे हस्तांतरित झाल्याप्रमाणे असतील आणि तिच्याकडे निहित असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय बनकर,**

शासनाचे उप सचिव.

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path
Fort, Mumbai 400 001, dated 2nd March 2019.

**Order**

MAHARASHTRA ZILLA PARISHAD AND PANCHAYAT SAMITI ACT, 1961.

No. ZPB-2018/CR-67/(4)/PR 5.—Whereas, the Government of Maharashtra, under the Notification, Urban Development Department, No. MUN-2018/C.R.12/UD-18 (hereinafter referred to as "the said Notification"), issued in exercise of the powers conferred by sub-sections (*1*), (*1A*) and (*2*) of section 341A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965), has specified the local area of revenue village of Dhanki in Yavatmal district to be a transitional area, for which a *Nagar Panchayat* as provided in sub-sections (*1*),(*1B*) and (*2*) of section 341A of the said Act, by the name of the *Dhanki Nagar Panchayat,* is constituted ;

And whereas, pursuant to the said notification, it is expedient to issue an order for transfer of assets, rights and liabilities of the existing local authority (including the rights and liabilities under any agreement or contract made by it), to the successor local authority under clause (vi) of sub-section (*2*) of section 255 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (vi) of sub-section (*2*) of section 255 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act, 1961 (Mah. V of 1962 ), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby directs that all the assets, rights and liabilities of the Yavatmal *Zilla Parishad* (including the rights and liabilities under any agreement or contract made by it), in respect of the revenue village *Dhanki* in Yavatmal District shall stands transferred to and shall vest in the *Nagar Panchayat of Dhanki,* on the terms and conditions specified in the Government Resolution, Rural Development and Water Conservation Department, No. MPH-1997/CR-645/56(47), dated the 20th July 1999.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANKAR,
Deputy Secretary to Government.

## नगरविकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मार्च २०१९

### आदेश

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमयुएन-२०१८/प्र.क्र. १२/नवि १८.—ज्याअर्थी, शासन अधिसूचना नगरविकास विभाग, एमयूएन-२०१८/प्र.क्र. १२/नवि १८, दिनांक २ मार्च २०१९ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या कलम ३४१ क चे पोट-कलम (१), (१ख), (२) आणि कलम ३ चे पोट-कलम (३) या तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने यवतमाळ जिल्ह्यातील ढाणकी या ग्रामपंचायतीचे स्थानिक क्षेत्र, ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रामध्ये संक्रमित होणारे क्षेत्र हे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यासाठी व उक्त संक्रमणात्मक क्षेत्रासाठी "ढाणकी नगरपंचायत" गठीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, नव्याने रचना केलेल्या ढाणकी नगरपंचायतीची रितसर रचना होईपर्यंत उक्त नगरपंचायतीचे अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी शासकीय अधिका-याची नियुक्ती करणे इष्ट वाटते;

म्हणून, आता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) कलम ३४० च्या पोट-कलम (२) व कलम ३४१ क च्या पोट-कलम (१), (१ख) व (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, नव्याने गठीत केलेल्या उक्त नगरपंचायतीची उक्त अधिनियमान्वये यथोचित रचना होईपर्यंत तहसीलदार, उमरखेड, जि. यवतमाळ यांची ढाणकी नगरपंचायतीच्या संबंधित सर्व अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सतीश मोघे,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 2nd March 2019

### Order

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MUN-2018/C.R.12/UD-18..—Whereas, by the Government Notification, Urban Development Department, No.MUN-2018/C.R.12/UD-18, dated the 2nd March 2019 issued in exercise of powers conferred by sub-section (*1*), (*1B*) (*2*) of section 341-A read with sub-section (*3*) of section 3 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 and of all other powers enabling it in that behalf the Government of Maharashtra has specified the local area of the Dhanki Village Panchayat in Yawatmal District being an area in transitional from a rural to an urban area and constitute a Nagar Panchayat by the name of the Dhanki Nagar Panchayat for the said transitional area.

And whereas, it is expedient to appoint the Government Officer to exercise all the powers and duties of the newly constituted Dhanki Nagar Panchayat till the said Nagar Panchayat is duly constituted ;

Now, therefore, in exercise of the power conferred by sub-section (*1*), (*1B*) (*2*) of section 341-A read with sub-section (*2*) of section 340 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 and of all other powers enabling it in that behalf the Government of Maharashtra hereby appoints the Tahsildar, Umarkhed, District Yawatmal as an Administrator of the said newly constituted the Dhanki Nagar Panchayat to exercise all the powers and duties relating to the Dhanki Nagar Panchayat till the said Dhanki Nagar Panchayat is duly constituted in accordance with the provision of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH MOGHE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.